# महाराष्ट्र शासन

## पर्यावरण विभाग

कार्यालयीन आदेश क्र.मुलाखत-२०१३/प्र.क्र.९२/३/आस्थापना
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक -२ जुलै, २०१३.

## कार्यालयीन आदेश

पर्यावरण विभाग, मंत्रालयामध्ये स्थापन झालेल्या सरदार सरोवर प्रकल्प (SSP) या कक्षासाठी तात्पुरत्या कालावधीकरिता निर्माण करण्यात आलेल्या कंत्राटी तत्वावरील पदावर खालील कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात येत आहे.

| क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | कक्ष | पदनाम | प्रतिमाह मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.गणेश राख | सरदार सरोवर प्रकल्प (SSP) | प्रकल्प सहायक | रु. ९,०००/- | ०८/०७/२०१३ ते ३१/१२/२०१३ |

सदर नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधिन राहील.

१) उक्त नियुक्तीमुळे सदर कर्मचाऱ्यांना राज्य शासन किंवा केंद्र शासनाचे कर्मचारी असल्याचे समजण्यात येणार नाही. तसेच, या नियुक्तीमुळे शासन सेवेतील समावेशनाबाबत त्यांना कोणताही दावा करता येणार नाही.

२) कामाचे दिवस व वेळ ही मंत्रालयीन कामकाजाकरिता विहित करण्यात आलेल्या दिवसांनुसार व कार्यालयीन वेळेनुसार राहील. कामकाजाच्या संदर्भात वरिष्ठांच्या सूचनांचे पालन करणे त्यांना बंधनकारक राहील, तसेच कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे.

३) ज्या दिवशी सदर कर्मचारी अनुपस्थित राहतील त्या दिवसाचे त्यांचे वेतन त्यांच्या मेहनतान्यामधून वजा करण्यात येईल.

४) प्रत्येक महिन्यातील त्यांच्या उपस्थितीनुसार व नियंत्रण अधिकाऱ्यांच्या मान्यतेने विहित कमाल मर्यादेत मेहनताना पुढील महिन्याच्या १५ तारखेनंतर देण्यात येईल.

५) सदर तात्पुरत्या नियुक्तीसंबंधात पर्यावरण विभागामार्फत वेळोवेळी घेतले जाणारे निर्णय अंतिम राहतील. निवड तात्पुरती असल्याने कोणतीही पूर्वसूचना न देता शासन सदर कर्मचाऱ्यांची नियुक्ती संपुष्टात आणू शकेल.

६) वरील कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभवासह आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती अयोग्य अथवा चूकीची असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती त्वरित संपुष्टात येईल.

७) उक्त कालावधीच्या अगोदर त्यांना काम सोडून जावयाचे असल्यास त्यांनी एक महिन्यांची पूर्वसूचना शासनास द्यावी लागेल, अन्यथा ज्या दिवसापासून सदर कर्मचारी काम सोडून जाईल, त्या दिवसापूर्वीच्या एक महिन्यांचा मेहनताना त्यांना देण्यात येणार नाही वा दिला असल्यास तो शासन तिजोरीत जमा करावा लागेल.

यासाठी येणारा खर्च यु-४, ३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण ०४, प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण १०३, वायु जल प्रदूषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(११) सरदार सरोवर प्रकल्प, पर्यावरण विषयक बाबींसाठी संनियंत्रण कक्षाची स्थापना (३४३५ ०२०६) ०१-वेतन या लेखाशिर्षाखाली दाखवावा आणि सन २०१३-१४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(दे. के. मानकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
प्रधान सचिव (पर्यावरण) यांचे वरीष्ठ स्वीय सहायक,मंत्रालय, मुंबई.
उप सचिव (आस्था) पर्यावरण विभाग,मंत्रालय, मुंबई.
शास्त्रज्ञ श्रेणी-१, तां.क.३,पर्यावरण विभाग,मंत्रालय,मुंबई.
सर्व संबंधित अधिकारी/कर्मचारी, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई
अधिदान व लेखाधिकारी,मुंबई/ निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कार्यासने, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.